# दोनदाच

जगण्याची संधी दोनदाच मिळते, असे दिसते
एक संधी स्वतःसाठी, दुसरी आपल्या स्वप्नांसाठी असते

वर्षे सरतात, आपले मचूळ आयुष्य भरकटत असते
अचानक एक प्रेम नावाचे स्वप्न समोर येऊन ठाकते

हे अनोळखी प्रेम खुणावते अनोख्या दिशेस नेऊ पाहाते
भ्यालात, चरकलात, शंकित झालात तर दिसेनासे होते

हे स्वप्न तुमच्यासाठी आहे, त्याची किंमत चुकती करा
आपण दोनदाच जगतो यास्तव हे एक स्वप्न खरे करा !

*Translation of the English song "You only live twice"*
*By: Abhay B. Joshi*